SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. शिवाजी वि/संलग्नता टी-२/परिपत्रक/ No - 1349 दि. 29 FEB 2024

# :: परिपत्रक ::

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये,

कोल्हापूर शहर व परिसर,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :- कोल्हापूर शहर व परिसरातील केएमटी बसने व एसटी बस ने ग्रामिण भागातून येणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या अडचणी / समस्येबाबत...**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ अंतर्गत सुरु असणाऱ्या महाविद्यालयातील कला व वाणिज्य विद्याशाखा सुरु होण्याची वेळ सकाळी ७.३० वा. ची असते व विज्ञान विद्याशाखा सुरु होण्याची वेळ साधारण ११.०० वा. ची असते.

तेव्हा कोल्हापूर शहरातील आपल्या वरीष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षण घेण्यासाठी ग्रामिण भागातून केएमटी बस, महामंडळाची जनता गाडी व महामंडळाच्या इतर लोकल एसटी बसने प्रवास करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना महाविद्यालय व केएमटी बस / एसटी बस यामधील वेळेची विसंगती असल्याने विद्यार्थ्यांना येण्या-जाण्यासाठी समस्या/अडचणी निर्माण होत आहेत.

त्याअनुषंगाने आपल्या वरीष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षणासाठी आजूबाजूच्या गावांमधून केएमटी बस, महामंडळाची जनता गाडी व इतर लोकल एसटी बस ने विद्यार्थी व विद्यार्थींनी यांना प्रवासासाठी कोणकोणत्या गावातून व कोणत्या मार्गे येण्या-जाण्यासाठी समस्या/अडचणी येतात याची सविस्तर माहिती विद्यापीठ कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावी

**कळावे,**

आदेशान्वये
PSPande 29/2/24
डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग